(181)

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२ ६९४०३३३३ ई.मेल :collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in

---

**तक्रार क्र.१८१**

क्र.:सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-१९२/२०२२
दिनांक :०५/०६/२०२३ 7849

**प्रति,**
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ,
बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**विषय :** मौजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२०५३-सी, २०५५अे,२०५४, २०५५-डी, २०५३-ई,२०५३-डी, १९६५.२०५५.२०५५-सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारतीचे बांधकाम होत असलेबाबत...

**संदर्भ :** १. आपलेकडील पत्र दि.०७/०४/२०२२, २२/०७/२०२२ व १३/१०/२०२२.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४७१/१९३/२०२२/२३ दि. १५/०५/२०२३.

उपरोक्त विषयांकित प्रकरणाबाबत आपलेकडील संदर्भिय क्र. १ अन्वये श्री. अमजद खान यांची मौजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२०५३-सी, २०५५अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारतीचे बांधकाम होत असलेबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र.२ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

मौजे एरंगळ, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २०५३-सी, २०५५अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी याठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारतीचे बांधकाम होत असलेबाबत तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक पश्चिम, मुंबई यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना सादर केलेल्या दि.०२/०३/२०२३ रोजीच्या अहवालात रकाना क्र. १५ मध्ये तक्रारीतील नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर जागेवर सन २००५ व सद्य:स्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या ३ इमारती जी.पी.एस. रिडींग क्र. १ ते ३ या सन २००५ नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून ५० मी. च्या बाहेर आहे. तसेच जी.पी.एस. रिडींग क्र. ४ च्या ठिकाणी असलेली भिंतीचे बांधकाम मढ प्लॉट पासून ५० मी. च्या आत येत आहे. परंतू, सदर पत्र्याचे बांधकाम सन २००५ च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे.

तसेच तहसीलदार बोरीवली यांचेकडील दि.०२/०३/२०२३ रोजीच्या अहवालाचे अवलोकन करता, सदर प्रकरणी कांदळवनाचे नुकसान झालेले नाही, असे नमुद आहे. प्रकरणी प्रश्नाधीन मिळकत ही खासगी मिळकत असल्याने तहसीलदार बोरीवली यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०२३ चे पत्रानुसार न.भू.क्र. २०५३/सी, २०५३/सी-१, २०५५/डी, २०५३, २०५३/डी, १६९५, २०५५/बी, २०५५/सी या खासगी मिळकतीवर डेब्रीजची मोठ्या प्रमाणावर भरणी केल्याने संबंधितांवर MRTP कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास सहा. आयुक्त, पी/उत्तर विभाग यांना कळविले आहे.

प्रकरणी मौजे एरंगळ, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २०५३-सी, २०५५अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी याठिकाणी या खासगी मिळकतीवर डेब्रीजची मोठ्या प्रमाणावर भरणी केल्याने संबंधितांवर MRTP कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करणेकामी या कार्यालयाकडील दि.०५/०६/२०२३ रोजीचे पत्रान्वये सहा. आयुक्त, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविणेत आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

(सतिश बागल)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.**

D:\Backup 2I\01.01.2022\Mangroves Complaint\बोरीवली\192 श्री. अमजद खान Apccf Ref..docx

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, नववा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दुरध्वी क्रमांक- ०२२-२६५१०१३६ ई-मेल :sdomsdest@gmail.com

क्रमांक:उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४७१/१९३/२०२२/२३ दिनांक :-१५/०५/२०२३

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी, उपनगर जिल्हा यांचे कार्यालय 19 MAY 2023

**विषय :** मौजे एरंगळ, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. २०५३-सी, २०५५ अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारतीचे बांधकाम होत असलेबाबत....

**संदर्भ :** १. आपलेकडील पत्र क्र.सी/कार्या-२आय/टे-८/ कावि-१९२/२०२२, दि.०१/०६/२०२२
२. तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र.तह/बोरी/टे-२/ कावि-८९९/२०२२, दि. ०२/०३/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्याकडील संदर्भीय पत्र क्र. १ सोबत प्राप्त झालेला मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना श्री. अजमद खान यांनी अग्रेषित केलेला तक्रार पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार बोरीवली यांचेकडे पाठविली असता, तहसीलदार बोरीवली यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई तथा सचिव तालुका स्तरीय कांदळवन संरक्षण समिती यांचेमार्फत चौकशी करून संदर्भी पत्र क्र. २ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

मौजे एरंगळ, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. २०५३ –सी, २०५५ अे, २०५४, २०५५ – डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५ –सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारतीचे बांधकाम होत असलेबाबत तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक पश्चिम, मुंबई यांनी अहवालात रकाना क्र. १५ मध्ये त्यांनी तक्रारीतल नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर जागेवर सन २००५ व सद्य:स्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या ३ इमारती (जी.पी.एस. रिडींग क्र. १ ते३) सन २००५ नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून ५० मी. च्या बाहेर आहे. जी. पी. एस. रिडींग क्र. ४ च्या ठिकाणी असलेली भिंतीचे बांधकाम मढ प्लॉट पासून ५० मी. च्या आत येत आहे. परंतू, सदरचे पत्र्याचे बांधकाम सन २००५ च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे. तरी सदर तक्रार आपले स्तरावर निकाली काढण्यात यावी. असे मत तहसीलदार बोरीवली यांनी दि. ०२/०३/२०२३ च्या अहवालात नमूद केले आहे.

तहसीलदार बोरीवली यांचे अहवालाचे अवलोकन करता, प्रकरणी कांदळवनाचे नुकसान झालेले नाही, असे नमुद आहे. प्रश्नाधीन मिळकत ही खासगी मिळकत असल्याचे दिसून येते. तहसीलदार



CamScanner

बोरीवली यांनी त्यांचेकडील दि. ०१/०३/२०२३ चे पत्रानुसार न.भू.क्र. २०५३/सी, २०५३/सी-१, २०५५/डी, २०५३, २०५३/डी, १६९५, २०५५/बी, २०५५/सी या खासगी मिळकतीवर डेब्रीजची मोठ्या प्रमाणावर भरणी केल्याने संबंधितांवर MRTP कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास सहा. आयुक्त, पी/उत्तर विभाग यांना कळविले आहे. कांदळवन क्षेत्राचे हद्दी पासून ५० मिटर आतील बांधकामाबाबत व भरणीबाबत सहा-आयुक्त, पी/उत्तर विभाग यांनी प्रचलीत कायद्यानुसार कार्यवाही करणेसाठी त्यांना आपल्या स्तरावरुन कळवावे, असे मत आहे.

तथापि आदेशार्थ सादर.

(डॉ. भागवत गावंडे)
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

9\T-5-2023.docx 758

CS CamScanner

(१२)

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.

दूरध्वनी क्र. २८०७५०३४ ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन

क्रमांक :-तह/वारी/ट-२/कावि-८९९/२०२२
दिनांक :- ०२/०३/२०२३

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

विषय :- **मौजे-एरंगळ ता. बोरीवली, येथील न.भू.क्र. २०५३/सी, २०५३/सी-१, २०५५ डी, २०५३ ई, २०५३ डी, १६९५, २०५५ बी, २०५५ सी या जागेवर कांदळवनापासून एक मीटरचे परीसराचे आत रहेजा बिल्डर्स आदेशाचा अवमान केले असल्याबाबत. श्री. अमजद खान यांची तक्रार.**

संदर्भ :- १) मा. उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-२४५/२०२२ दि. २७/०५/२०२२.
२) वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/अंधेरी तक्रा/८८४/२०२२-२३ दि. २१/०९/२०२२ रोजी अग्रेषित केलेला अहवाल.
३) या कार्यालयाचे समक्रमाकांचे वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांना दिलेले दि. ०१/०३/२०२३ रोजीचे पत्र.
४) वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/अंधेरी तक्रा/१६७६/२०२२-२३ दि. ०२/०३/२०२३ रोजीचा अग्रेषित केलेला अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयाकींत प्रकरणी सादर करणेत येते की, प्रकरणी तक्रारदार, श्री. अमजद खान यांनी दि. ३०/१२/२०२१ रोजी मौजे-एरंगळ गांव, मालाड (प), ता. बोरीवली, येथील न.भू.क्र. २०५३/सी, २०५३/सी-१, २०५५ डी, २०५३ ई, २०५३ डी, १६९५, २०५५ बी, २०५५ सी येथे कांदळवन क्षेत्रामध्ये अवैध भरणी करून कांदळवनाचा -हास करीत असल्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

त्या अनुषंगाने वन परिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी या कार्यालयास अग्रेषित केलेल्या संदर्भिय क्र. २ अहवालाचे अनुषंगाने या कार्यालयाने संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये विषयांकीत मिळकतीवर असलेले बांधकाम सन २००५ पूर्वीचे आहे अगर कसे ? याबाबत सविस्तर अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी या संदर्भिय



CS CamScanner

क्र. ४ चे पत्रान्वये या कार्यालयास सादर केलेल्या अहवालाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत ये
आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांचे अहवालात रकाना क्र. १५ मध्ये त्य
तक्रारातील नमूद क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर जागेवर
२००५ व सद्य:स्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आले
३ इमारती (जी.पी.एस. रिडींग क्र. १ ते ३) सन २००५ नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून ५०
च्या बाहेर आहे. जी. पी.एस.रिडींग क्र. ४ च्या ठिकाणी असलेली भिंतीचे बांधकाम मढ प्लॉट पासून ५० मी. च्या अ
येत आहे. परंतु, सदरचे पत्र्याचे बांधकाम सन २००५ च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे असे नमूद केल
आहे. (सोबत प्रत). **सबब सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी.** अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

(विनोद धोत्रे)
तहसीलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी बोरीवली

**प्रत :-** मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

CS CamScanner

(A)

महाराष्ट्र शासन
वनविभाग

Email Id:
rfomangrovewm@gmail.com

## वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचे कार्यालय

स. न. १४७ पंचम सोसायटीजवळ, गोखले महाविद्यालय मार्ग,गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१

**सुधारीत अहवाल**

जा.क्र. अ.पश्चिम मुंबई/बोरी. तक्रा./1676/2022-23
बोरीवली दि : 02/03/2023

प्रति,
मा. अध्यक्ष
तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी प. उपनगरे

**विषय :** मौजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र.2053-सी, 2055-अे, 2054, 2055-डी, 2053-ई, 2053-डी, 1965. 2055. 2055-सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळ परिसरात इमारीतचे बांधकाम होत असलेबाबत.

**संदर्भ :** 1)मा. सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कांदळवन व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन संरक्षण, मुंबई यांचे कडील जा.क्र.सवसं/कांसंमुं/300/2022-23 दि.14.07.2022
2) वनपाल अंधेरी यांचेकडील जा.क्र./159/2022-23 दि.11.08.2022
3) या कार्यालयाकडील जा.क्र. अ.प.मुंबई/अंधेरी.तक्रा/884/2022-23 दि. 21.09.2022
4) दि. 08.02.2023 रोजी झालेल्या बैठकितील आदेश.

**मुळ तक्रारदार :** श्री. अमजद खान

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकित प्रकरणी श्री. अमजद खान यांचा मौजे एरंगळ मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अहवाल सादर करीत आहे तो खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| 1)स्थळाचे वर्णन : | मौजे एरंगळ, |
| 2)तक्रारीचा तपशील : | वरील विषयाप्रमाणे. |
| 3)चौकशी करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम : | श्री. महादेव नाथा शिंगाडे, वनपाल बोरीवली<br>खालील विभागाकडील अधिकारी :-<br>1) मंडळ अधिकारी गोरेगांव |

CamScanner

| | |
|---|---|
| | 2) तलाठी सजां गोरेगांव |
| 4)स्थळाचे जी.पी.एस.रिडिंग - | 1) N 19 09.073 E 72 47.886<br>2) N 19 09.070 E 72 47.866<br>3) N 19 09.073 E 72 47.845<br>4) N 19 08.939 E 72 47.865 |
| 5)Geo Tag Photo - | सोबत जोडले आहेत. |
| 6)स्थळपंचनामा - | सोबत जोडला आहे. |
| 7)तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा- | |
| अ)तक्रारीत नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र. तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित क्र. | नाही |
| ब)सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का? असल्यास अंतर (मी.) | होय, जी.पी.एस. रिडींग क्र. 4 चे क्षेत्र |
| क)सदरचे क्षेत्र खासगी कांदळवन क्षेत्र आहे का ? | नाही |
| ड)सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? | सांगता येत नाही |
| 8)सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC Map नुसार नमुद जागेवर कांदळवन होते का ? | नाही |
| 09)सदरचा अतिक्रमण/भरणी सन 2005 च्या आधी किंवा नंतर करण्यात आले आहे किंवा कसे ? | MRSAC नकाशानुसार जी.पी.एस. रिडींग क्र. 1 ते 3 च्या ठिकाणी बांधण्यात आलेले इमारत सन 2005 नंतर बांधण्यात आलेले दिसून येत आहे. व जी.पी.एस. रिडींग क्र. 4 वर असलेली भिंत मढ प्लॉट पासून 50 मी. च्या आत येत आहे. परंतु सदरची भिंत सन 2005 च्या आधी बांधण्यात आलेली दिसून येत आहे. |
| 10) कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे का ? | नाही |
| 11)सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय | नाही |
| 12)अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का? | नाही |
| 13)अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्र असल्यास संबंधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का? | या प्रत्राद्वारे कळविण्यात येत आहे. |
| 14)कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे? | पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अन्वये प्राधिकृत अधिकारी |

CS CamScanner

| | |
|---|---|
| 15)वनक्षेत्रपाल यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय - | तक्रारीतील नमुद क्षेत्र अधिसुचित राखिव कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानुसार सदर जागेवर सन 2005 व सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. MRSAC नकाशानुसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या 3 इमारती (जी.पी.एस. रिडींग क्र. 1 ते 3) सन 2005 नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून 50 मी.च्या बाहेर आहे. जी. पी.एस रिडींग क्र. 4 च्या ठिकाणी असलेली भिंतीचे बांधकाम मढ प्लॉट पासून 50 मी. च्या आत येत आहे. परंतु सदरचे पत्र्याचे बांधकाम सन 2005 च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे. |


(एस.के. खुणे)
वनपरिक्षेत्र अधिकारी,
मुं.का.सं.घ.पश्चिम मुंबई

प्रतिलीपी : 1) मा. सदस्य सचिव जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन संरक्षण मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.

2) तहसीलदार बोरीवली यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.

3) श्री. अमजद खान यांना माहितीसाठी.

CS CamScanner




CS CamScanner

(31)

# पंचनामा

1) श्री. लक्ष्मण दत्तू पाटील वय - 48 वर्षे धंदा - नोकरी
रुम नं - 4, प्लाट नं 719, से. 7. चारकोप.
मुंबई - 67. मो. नं. 8369268818

2) श्री. राकेश मोहन पात्री. वय - 34 वर्षे धंदा - नोकरी.
शिवाजीनगर रूम नं - 03, कांदिवली चाळ.
मालाड(प) मुंबई मो. नं. 8879565986

आम्ही पंचास कांदळवन विभागाचे अधिकारी वनपाल अंधेरी, वनरक्षक मालवणी, वनरक्षक वर्सोवा, मंडळ अधिकारी गोरेगाव, तलाठी सजा गोरेगाव यांनी मौजे एरंगळ येथे रत्ना एक्झोटिका बिल्डींगजवळ बोलाविल्याने आम्ही पंचलोक एकत्र जमून आलो. तेथे जमून आल्यानंतर वनअधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र 626/2022-23 दि 3/8/2022 चे पत्र आम्हास वाचून दाखविले. सदर पत्रात श्री अमजदखान यांनी मौजे एरंगळ न.भू.क्र 2053 सी, 2055-ओ, 2054, 2055 डी, 2053-ई, 2053 डी. 1965, 2055, 2055 सी या ठिकाणी कांदळवनापासून जवळच्या ठिकाणी बांधकाम होत असल्याबाबतची तक्रार केल्याने त्या अनुषंगाने समक्ष जागेवर पाहणी करून सद्यपरिस्थितीचा पंचनामा लिहून देणेकामी विनंति केल्यावरून पंचमत लिहून देत आहोत ते खालीलप्रमाणे.

आज दि. 05/08/2022 रोजी आम्ही पंच, कांदळवन विभागाचे अधिकारी, ~~[illegible]~~ महसूल विभागाचे प्रतिनिधी मंडळ अधिकारी गोरेगाव, तलाठी सजा गोरेगाव रत्ना एक्झोटिका बिल्डींगचे आत एकत्र जमून आलो, तक्रारदार श्री अमजदखान हे समक्ष जागेवर स्थळपाहणीकामी हजर राहिले नाहीत. त्यामुळे वनअधिकारी यांनी त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक 9820717153 वर संपर्क साधला असता त्यांनी स्थळपाहणीस हजर राहणे शक्य होणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे तलाठी सजा गोरेगाव, मंडळअधिकारी गोरेगाव यांचेकडून सदर पत्रातील नमूद जागेची खात्री करून वर नमूद केलेल्या क्षेत्राची आम्ही पंचासमक्ष फिरून पाहणी केली. वरीलप्रमाणे नमूद क्षेत्र हे मौजे एरंगळ न.भू.क्र. 2053-सी, 2055 ओ, 2054, 2055-डी, 2053-ई, 2053 डी 1965, 2055, 2055 सी क्षेत्रात सभोवार फिरून पाहणी केली असता सदर क्षेत्रात अस्थिर बांधकाम केलेल्या अवस्थेत जुन्या स्वरूपाच्या तीन बिल्डींग दिसून येत आहेत. क्षेत्राचे सभोवार एक मोठ दगडी भिंत असून त्यावर पत्रे मारून बंद केलेले दिसून येत आहे. सदर

क्षेत्रात कोठेही कांदळवन दिसत नाहीत समोवार दगडीभिंतीलगत कांदळवन दिसून येत आहे. सदर क्षेत्रालगत न.भू.क्र. १४३२ लगत असून सदरचे कांदळवन दि. ३०.०५.२०२२ रोजी कांदळवनविभागाचे ताब्यात दिल्याचे कांदळवन-विभागाचे अधिकारी यांनी सांगितले. सदर क्षेत्राची चतुःसिमा घेतली ती खालीलप्रमाणे.

पूर्वेस – कांदळवन, खाडी. पश्चिमेस - किसनबाबवा उत्तरेस - कांदळवनखाडी दक्षिणेस - ४६ कोठी, पावाकालवडी

सदर क्षेत्राचे जी.पी.एस नोंदी घेतल्या त्या खालीलप्रमाणे.

1) 19 09.073
72 47.886

2) 19 09.070
72 47.866

3) 19 09.073
72 47.845

तसेच तक्रारी अर्जात नमूद केलेल्या रहेजा कन्स्ट्रक्शन बिल्डिंग नं.१ अ.व बिल्डिंग नं ६व इमारतीच्या बांधकामाबाबत तक्रार केल्याने सदर जागेवर पाहणी केली असता, बिल्डिंग नं.१ अ बांधकाम अर्धवट स्थितीत असून बिल्डिंग नं ६ बचे बांधकाम अद्यापी सुरु झाले नसल्याचे दिसून येत आहे. सदर क्षेत्राचे जी.पी.एस नोंदी घेतल्या त्या खालीलप्रमाणे.

1) 19 08.939
72 47.865


वरीलप्रमाणे बिल्डिंग समोवार दगडी भिंत, पत्र्याचे कंपाऊंड असून लगत कांदळवन दिसून येत आहे. सदर क्षेत्रात पाहणी केली असता कोणतीही नव्याने कांदळवनाची तोड अथवा भराव आढळून दिसून आला नाही.


वरील नमूद परिस्थितीचा पंचनामा आम्ही पंच, कांदळवनविभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी या सर्वांनी मिळून पाहून, पाहिल्याप्रमाणे व सांगितल्याप्रमाणे लिहिण्यात आला. पंचनामा आम्हा पंचास वाचून दाखविला. पंचनाम्यात नमूद केलेला मजकूर सत्य असल्याची खात्री झाल्याने वनअधिकाऱ्यासमक्ष आम्ही उभय पंचांनी सह्या केल्या आहेत.


हा पंचनामा प्रत्यक्ष जागेवर लिहून दिला असे.

ठिकाण - मरोळ
दि. 05/08/2022


Shashikant Shetty
6/8/2022



Mumbai, Maharashtra, India
Google


Mumbai, Maharashtra, India
RAHEJA EXOTICA
Google


Mumbai, Maharashtra, India


Mumbai, Maharashtra, India


erngal 2022
Legend
19.08.939 72.47.865
Google


erngal 2005
Legend

CamScanner